# महाराष्ट्र शासन

क्रमांक भांखसं २०१३/प्र.क्र.१०२/१३/उद्योग-४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४/०७/२०१३.

प्रति,

अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालीयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय :-** भांडार खरेदी संदर्भात शासन निर्णय दि.२/१/१९९२ नुसार खरेदीबाबत दरकरार/दरनिश्चिती करणेबाबत.

महोदय/महोदया,

दरकरारावरील आरक्षित साहित्याची खरेदी करण्यासंदर्भात व दिनांक १६/२/२०१३ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनाबाबत व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विभाग व महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत झालेल्या भांडार खरेदी व चालू आर्थिक वर्षात (सन २०१३-१४) होणा-या भांडार खरेदीच्या रुपरेषेबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि.२७/६/२०१३ रोजी दुपारी १२.३० वाजता झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

आपला,

**( वि. ए. गायकवाड )**
कक्ष अधिकारी.

प्रत :-

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, २ रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ३२ यांच्याकडे इतिवृत्ताच्या प्रतीसह अग्रेषित. त्यांना विनंती करण्यांत येते की, सदर इतिवृत्ताच्या प्रती सर्व संबंधितांकडे पाठविण्यांची व सदर इतिवृत्त उद्योग संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

दर करारावरील आरक्षित साहित्याची खरेदी करण्यासंदर्भात

**दिनांक २७/६/२०१३ रोजी दुपारी १२.३० वाजता झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

दर करारावरील आरक्षित साहित्याची खरेदी करण्यासंदर्भात व तसेच दि. 16.2.2013 रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना बाबत व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व महिला व बालकल्याण विकास विभागांतर्गत झालेल्या भांडार खरेदी व चालू आर्थिक वर्षात (सन 2013-14) होणाऱ्या भांडार खरेदीच्या रुपरेषेबाबत **मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार** दि. 27.06.2013 रोजी **दु.** 12.30 **वाजता बैठक झाली.** सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी | पदनांम |
|---|---|---|
| 1. | श्री. एस.के. श्रीवास्तव | प्रधान सचिव (वित्त) |
| 2. | श्री. अपूर्व चंद्रा | प्रधान सचिव (उद्योग) |
| 3. | श्रीमती राधिका रस्तोगी | सचिव (लघु व मध्यम) तथा विकास आयुक्त (उद्योग) |
| 4. | श्री. जगताप | सहसचिव, नियोजन विभाग |
| 5. | श्री. उ.शि. लोणारे | उपसचिव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |
| 6. | श्री. बी.ओ. ठाकूर | कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग |
| 7. | श्री. अ.चं. झावरे | सहाय्यक, आदिवासी विकास विभाग |
| 8. | श्री. अमोल खंडारे | विशेष कार्य अधिकारी, नियोजन विभाग |
| 9. | श्री. वा.दौ. देसले | उद्योग सह संचालक, भांडार खरेदी |

बैठकीच्या सुरवातीस प्रधान सचिव (वित्त) यांनी दि. 16.02.2013 रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय कोणत्या परिस्थितीत घेण्यात आला, तसेच दर करारावरील वस्तूंची खरेदी करताना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग यांनी एकाच वेळी रु. 10.00 कोटी व त्यापेक्षा जास्त रक्कमेची खरेदी, दरकरार/दरनिश्चिती व्दारे मार्च अखेर केली आहे. अश्या खरेदीमध्ये bulk purchase वर जी सूट (discount) च्या फायद्यापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे दरकरारास मान्यता देण्याबाबत तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

उद्योग संचालनालयामार्फत शासन निर्णय 2.01.1992 नुसार तीन किंवा त्यापेक्षा जास्त शासकीय विभागांना लागणाऱ्या साहित्यांचे दरकरार ई-निविदा पध्दतीने निविदा मागवून दरकरार बांधील केले जातात. तसेच अंध, अपंग यांच्या धर्मादाय संस्था, महामंडळे, सहकारी संस्था यांनी उत्पादित केलेल्या वस्तू ज्या राखीव केल्या आहेत त्या निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी न करता दरनिश्चिती व्दारे खरेदी करण्यात येत होत्या, असे चर्चेत विकास आयुक्त (उद्योग) यांनी सांगितले. त्या नुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा

शासन निर्णय 2.01.1992 मधील परिशिष्ट - 4 व परिशिष्ट -5 मधील वस्तुंच्या खरेदीबाबत चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | बैठकीत घेतलेला निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/ अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | उद्योग संचालनालयाने शासन निर्णय 1992 च्या परिशिष्ट-4 मधील 3 किंवा त्यापेक्षा जास्त शासकीय विभाग/ उपक्रमे/स्वायत संस्था यांना दरवर्षी लागणाऱ्या साहित्याचे दरकरार ई-निविदा पध्दतीने बांधील करावेत. सन 2012-13 साठी (1) सायकली (2) ताडपत्री (प्लास्टिक) (3) ताडपत्री (कॅनव्हास) (4) प्लास्टिक मॅट (5) शिलाई मशिन (6) वॉटरफिल्टर कम प्युरिफायर या साहित्यांचे दरकरार बांधिल करण्याचा निर्णय घेण्यात आला. | उद्योग संचालनालय | | |
| 2 | परिशिष्ट-4 मध्ये उर्वरित साहित्यांचे ज्या कार्यालयांना आवश्यकता आहे त्यांनी गरजेनुसार आपल्या स्तरावर शासन निर्णय 1992 व सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.29.10.2001 व 10.02.2005 व तसेच शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या प्रचलित ई-निविदा पध्दतीने खरेदी करावी असा निर्णय घेण्यात आला. | सर्व संबंधित प्रशासकीय विभाग | | |
| 3 | उद्योग संचालनालय, खादी ग्रामोद्योग महामंडळ, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ इत्यादींमार्फत दरकरार बांधिल केले असतील तर संबंधित विभागाने प्रत्येक बाबीची वार्षिक खरेदी रु. 1.00 कोटीपेक्षा कमी किमतीची असल्यास उपलब्ध करण्यात आलेल्या दरकराराच्या आधारे खरेदी करावी. व ज्या विभागांची वार्षिक खरेदी रु. 1.00 कोटी व त्यापेक्षा जास्त किंमतीची असेल त्या विभागाने दरकराराच्या आधारे खरेदी न करता प्रशासकीय विभाग प्रमुखांच्या मान्यतेने ई-निविदा पध्दतीने खरेदी करावी. अशा प्रकारे खरेदी केल्यास पुरवठादाराकडून एकत्रित खरेदीमुळे (bulk purchase) सूट (discount) मिळविता येईल. परंतू, अशी खरेदी दरकराराच्या दरापेक्षा जास्तीच्या दराने होणार नाही (for | सर्व संबंधित प्रशासकीय विभाग | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | similar specification) याची खबरदारी प्रशासकीय विभागांनी घ्यावी. | | |
| 4 | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय 2.01.1992 मधील परिशिष्ट-5 मधील शासनाचे अंगीकृत व्यवसाय, सहकारी संस्था, अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था व इतर संस्था यांना त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी आरक्षण देण्यात आले आहे. व अशा संस्थांच्या उत्पादित वस्तुंची दरनिश्चिती ई-निविदा पध्दतीने न करता शासन निर्णयातील भांडार खरेदी समिती मार्फत केली जात आहे.<br>परंतु, मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने मे. प्रीती महिला मंडळ व बचतगट जि. गडचिरोली व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व श्री. जगदंबा महिला रेडिमेड ड्रेसीस, सोलापूर व इतर, याचिका क्र. 2545/2012 प्रकरणी निकाल देताना **शासनाने अशा संस्थांची दरनिश्चिती करण्यात येवू नये व यापुढे जाहिर निविदा/लीलाव पध्दतीने निविदा मागवून नियमानुसार खरेदी प्रकिया राबवावी असे आदेश दिलेले आहेत.** वरील **आदेशाच्या अनुषंगाने राखीव वस्तुंची /साहित्याची दरनिश्चिती** यापुढे करण्यात येणार नाही. | उद्योग संचालनालय | |
| 5 | मा. मुख्य सचिवांनी निर्देश दिले की, ज्या शासकीय विभागांकडून वैयक्तिक लाभार्थ्यासाठी योजना राबविण्यात येत असतील उदा. सायकल, शिलाई मशिन, भांडी यासारखे साहित्य खरेदी करुन वाटप न करता वैयक्तिक लाभार्थ्यांच्या नांवे असलेल्या बँक खात्यांत प्रशासकीय विभाग प्रमुखांच्या मान्यतेने उचित रक्कम जमा करण्याबाबत अभ्यास करावा यामुळे लाभार्थी सदर साहित्य आपल्या सोयीचे, ब्रॅंडचे खरेदी करु शकेल. या विषयावर दोन महिन्यानंतर परत बैठक घेण्यात येईल. | सर्व संबंधित प्रशासकीय विभाग | |
| 6 | मा. मुख्य सचिवांनी **असे निर्देश दिले की सन** 2012-13 मध्ये शासन निर्णय 1992 मधील भांडार खरेदी समितीने मान्यता दिलेले व बांधील केलेले दरकरार व दरनिश्चितीच्या आधारे कोणकोणत्या विभागांने कार्यालय निहाय किती संख्येने रक्कमेची खरेदी केली तसेच खाजगी संस्था विक्रेत्यांकडून खरेदी केली त्याचा बाब निहाय अहवाल सादर करावा तसेच पशासकीय | सर्व संबंधित प्रशासकीय विभाग | दिनांक २६/७/२०१३ पर्यंत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विभागाने स्वतंत्रपणे त्यांचे स्तरावर निविदा पध्दतीने कोणत्या वस्तूंची व किती रक्कमेची खरेदी केली आहे यावीही माहिती तात्काळ उद्योग संचालनालयास सादर करावी सदरची माहिती प्राप्त झाल्यावर या प्रकरणी पुढील निर्णय घेण्यात येईल. | | | |
| 7 | कारागृह विभागासाठी काही बाबी राखीव करण्यात आलेल्या आहेत. तरी गृह विभागाने प्रत्येक कारागृह निहाय किती बाबींचे उत्पादन केले जाते, कोणते विभाग खरेदी करतात, कारागृहनिहाय क्षमता इत्यादींचा आढावा घेवून अहवाल सादर करावा असा निर्णय घेण्यात आला. | गृह विभाग | दिनांक २६/७/२०१३ पर्यंत | |

बैठकीत सर्वांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

* * * * * * * * * *